जा.क्र./मनपा/सा.प्र.वि./आस्था-१/२०२४/ १०५५
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
दिनांक : ३०/०४/२०२४

**कार्यालयीन परिपत्रक :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम १९ च्या पोटनियम (१) व त्या खालील टीप ३ अनुसार वर्ग-१, वर्ग-२ आणि वर्ग-३ या शासकीय अधिकारी/कर्मचा-यांनी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक वशिअ १२१४/प्र.क्र.२६/२०११ मंत्रालय मुंबई-४०००३२ दि.०२ जुन २०१४ व शासन निर्णय क्रमांक वशिअ-१२१४/प्र.क्र.५१ (२)/११ मंत्रालय मुंबई-४०००३२ दि.१७ नोव्हेंबर २०१४ तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४२७/न.वि.-२०, दि.०७ जानेवारी २०१६ अन्वये प्रत्येक वर्ग-१, वर्ग-२ आणि वर्ग-३ या महानगरपालिका कर्मचा-यांनी त्यांची व कुटुंबियांची मालकी असलेल्या मत्ता व दायित्वे यांची वार्षिक माहितीचे विवरणपत्र दि.३१ मे पर्यंत सादर करणे अनिवार्य आहे. मत्ता व दायित्व विवरणपत्रे सादर न करणे व विलंबाने सादर करण्याचे परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

१. शासन निर्णय क्रमांक:वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११,दि.०२ जुन २०१४ या शासन निर्णयानुसार कोणतेही विवरण विहीत कालावधीत सादर न केल्यास ती गैरवर्तणुक मानण्यात येईल व अशा वर्तणुकीबद्दल महाराष्ट्र महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

२. त्या त्या वर्षाची मालमत्ता विवरणपत्रे सादर न केल्यास पदोन्नती, सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गतच्या पदोन्नती, प्रतिनियुक्ती, विदेश दौरा यासाठी पुर्व अट म्हणुन विहीत करण्यात येत आहे. परिणामी कोणत्याही कर्मचा-यास आश्वासित व नियमित पदोन्नतीचा लाभ देण्यापुर्वी किंवा प्रतिनियुक्तीस अनुमती देण्यापुर्वी त्याने त्या वर्षाचे ३१ मार्च रोजीचे मालमत्ता विवरणपत्र सादर केले नसल्यास त्याला पदोन्नती/आश्वासित प्रगती योजनेतील पदोन्नती देण्यात येऊ नये व अशी विवरणपत्रे सादर केल्यानंतरच त्याला पदोन्नती दिली जाईल. तसेच असे विवरणपत्र सादर केले नसेल तर त्यास प्रतिनियुक्ती किंवा विदेश दौ-यास अनुमती देण्यात येणार नाही.

या परिपत्रकान्वये सर्व विभाग प्रमुख/शाखा प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त वर्ग १ ते ३ संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या मालमत्ता विवरणपत्रांची बंद पाकीटे आणि यादी खालील नमुन्यात तयार करून आस्थापना-१ विभागास सादर करण्यात यावी.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचा-यांचे नाव | पदनाम | मत्ता व दायित्वे विवरणपत्र सादर केले आहे काय ? |
|---|---|---|---|
| | | | |

दि.३१ मार्च २०२४ रोजीची स्थिती दर्शविणारे मत्ता व दायित्व विवरणपत्रांची बंद पाकिटे दि.३१/०५/२०२४ पर्यंत आस्थापना-१ विभागाकडे पाठवावीत. मालमत्ता विवरणपत्रांच्या माहिती अभावी कर्मचा-यांना पदोन्नती किंवा सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभासाठी अपात्र ठरविण्यात येईल,याची नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन दयावे.

अतिरिक्त आयुक्त-१
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

प्रति,

सर्व शाखा प्रमुख / विभाग प्रमुख,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका.